Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ५, अंक ४१] गुरुवार ते बुधवार, ऑक्टोबर १०-१६, २०१९/आश्विन १८-२४, शके १९४१ [पृष्ठे १६, किंमत : रुपये १०.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग एक—अमरावती विभागीय पुरवणी

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **भाग एक-शासकीय अधिसूचना :** नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ, चार–अ, चार-ब व चार–क यांमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | नाही. |
| **संकीर्ण अधिसूचना :** नेमणुका इ. इ., केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | १-१६ |
| **भाग एक-अ.**—(भाग चार-ब यामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम याअन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना. | नाही. |

## शासकीय अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

नाही.

## संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ११७५.

### जिल्हाधिकारी, यांजकडून

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक प्र.अ.-भूसं.-अका.-कावि-५९०-२०१९.—

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या अमरावती जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांनी भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून अधिसूचना, क्र. ६३, दिनांक २१-१-२०१९ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढलेली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, अमरावती जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांनी कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे ;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीनमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित प्रयोजनासाठी " बुडीत क्षेत्र " म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची-चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकारी यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), अपर वर्धा प्रकल्प क्रमांक ४, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांना पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची-एक

## जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक ७-४७-२०१७-२०१८,

गाव गोविंदपूर, तालुका भातकुली, जिल्हा अमरावती

| अनुक्रमांक | सर्व्हे नंबर/ गट नंबर | सं. मो. प्रमाणे क्षेत्र |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर |
| १ | ४/९ | ० १० |
| २ | ४/१० | ० ०८ |
| ३ | ३पै | ० ०४ |
| ४ | २/५ | ० ०४ |
| ५ | १/४ | ० १० |
| | एकूण संपादित क्षेत्र . . | ० ३६ |

## अनुसूची-दोन

## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव.—निम्न पेढी प्रकल्प.

प्रकल्प कार्याचे वर्णन.—निम्न पेढी प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील पर्यायी रस्ता धामोरी ते भातकुली रा. मा. ३०९ रस्त्याच्या कामाकरिता.

समाजाला मिळणारे लाभ.—निम्न पेढी प्रकल्पाच्या पर्यायी रस्त्यामुळे संबंधित भूधारकांना वाहतुकीकरिता लाभ मिळणार आहे.

## अनुसूची-तीन

## पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

– निरंक –

## अनुसूची-चार

## पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश

– निरंक –

दिनांक २१ सप्टेंबर २०१९.

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ११७६.

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक प्र.अ.-भूसं.-अका.-कावि-६०९-२०१९.—

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या अमरावती जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांनी भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा केला आहे) याच्या कलम-११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून अधिसूचना, क्र. १०१, दिनांक ३१-१-२०१९ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढलेली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, अमरावती जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांनी कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे ;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीनमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित प्रयोजनासाठी "बुडीत क्षेत्र" म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची-चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकारी यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), अप्पर वर्धा प्रकल्प क्रमांक ४, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांना पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची-एक**

**जमिनीचे वर्णन**

भूसंपादन प्रकरण क्रमांक १४-४७-२०१७-२०१८,

गाव गायवाडी, तालुका भातकुली, जिल्हा अमरावती.

| अनुक्रमांक | सर्व्हे नंबर/ गट नंबर | सं. मो. प्रमाणे क्षेत्र |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर |
| १ | ५ | ० ०२ |
| २ | ६ | ० ०२ |
| ३ | ७ | ० ०७ |
| ४ | ८ | ० १३ |
| ५ | ९ | ० ०२ |
| ६ | १० | ० ०९ |
| ७ | २४/१ | ० ०२ |
| ८ | २४/२ | ० ०२ |
| ९ | २५ | ० ०३ |
| १० | २६ | ० ०४ |
| ११ | २७ | ० ०८ |
| १२ | २८ | ० ०९ |
| १३ | २९ | ० ०३ |
| १४ | ३०/१ | ० ०१ |
| १५ | ३०/२ | ० ०२ |
| | एकूण संपादित क्षेत्र . . | ० ६४ |

**अनुसूची-दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

प्रकल्पाचे नाव.—निम्न पेढी प्रकल्प.

प्रकल्प कार्याचे वर्णन.—निम्न पेढी प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील पर्यायी रस्ता धामोरी ते भातकुली रा. मा. ३०९ रस्त्याच्या कामाकरिता.

समाजाला मिळणारे लाभ.—निम्न पेढी प्रकल्पाच्या पर्यायी रस्त्यामुळे संबंधित भूधारकांना वाहतुकीकरिता लाभ मिळणार आहे.

**अनुसूची-तीन**

**पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन**

– निरंक –

**अनुसूची-चार**

**पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश**

– निरंक -

दिनांक २३ सप्टेंबर २०१९.

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ११७७.

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक प्र.अ.-भूसं-अ.का.-कावि-६०१-२०१९.—

ज्याअर्थी, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली अधिसूचना महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण ११-२०१४-प्र.क्र. ७७-अ-२, दिनांक १९ जानेवारी, २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड-ए) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या अमरावती जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यास यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त जमीन " असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त सार्वजनिक प्रयोजन " असा केला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते. ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची-दोनमध्ये दिलेले आहे;

आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची-तीनमध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमूद करावीत.) ;

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची-चारमध्ये दिलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची-पाचमध्ये दिलेला आहे (नियुक्ती करणे आवश्यक असेल तर, या अनुसूचीमध्ये तपशील नमूद करावा).

त्याअर्थी, आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (४) अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल ;

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धीपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका-यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश " उक्त नियम " असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम १० च्या उप-नियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखिल घोषित करण्यात येत आहे.

आणि म्हणून त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी, (भूसंपादन) अपर वर्धा प्रकल्प क्र. ४, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांना पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची-एक**

**जमिनीचे वर्णन**

भूसंपादन प्रकरण क्रमांक १३-४७-२०१६-१७,

गाव-घुईखेड, तालुका-चांदुर-रेल्वे, जिल्हा-अमरावती.

| अ. क्र. | न. भू./प्लॉट नंबर | अंदाजित क्षेत्र |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | चौ. मी. |
| १ | ७०६ | ४४२.०० |
| | एकूण . . | ४४२.०० |

**अनुसूची-दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

प्रकल्पाचे नाव : बेंबळा प्रकल्प.

प्रकल्प कार्याचे वर्णन : बेंबळा प्रकल्प मौजा घुईखेड, ता. चांदुर-रेल्वे येथील गावठाणातील सेवा सहकारी सोसायटी, गोडावूनच्या खुल्या जागेसाठी पट्टा टी. एल. आर. मार्फत नियमीत झाल्याने भुखंड क्र. ७०६ चे खुल्या जागेबाबत संपादन.

समाजाला मिळणारे लाभ : लोक विकास कार्याचे कामाकरिता.

**अनुसूची-तीन**

**बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे**

सबब माहिती-निरंक

**अनुसूची-चार**

**पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश**

सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश (सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणा-या अभिकरणाने दिलेला) : महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ४-अ महसुल व वन विभाग, मुंबई दिनांक १३ मार्च २०१५ मधील अधिसूचना अन्वये सुट देण्यात आली आहे.

**अनुसूची-पाच**

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील**

(अ) प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिका-याचे पदनाम : प्रशासक नियुक्तीची आवश्यकता नाही.

(ब) प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता : निरंक

(क) ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशील : निरंक

**टीप :** उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), अपर वर्धा प्रकल्प क्रमांक ४, अमरावती यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

अमरावती :
दिनांक २१ सप्टेंबर २०१९.

**शैलेश नवाल,**
जिल्हाधिकारी, अमरावती.

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ११७८.

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक-क.लि.भूसं.-कावि-३०४२-२०१९.—

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या अकोला जिल्ह्याच्या जिल्हाधिका-याने भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून अधिसूचना काढली आहे. आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, अकोला जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांनी कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर " उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी " उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे, याबाबत त्यांची खात्री पटली आहे ;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदींन्वये " उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी " उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसची-तीन, चार व पाच मधील सारांश निरंक आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन हे जिल्हाधिकारी, अकोला आहेत.

**अनुसूची-एक**

**संपादीत करावयाच्या जमिनीचे वर्णन**

भूसंपादन प्रकरण क्रमांक एलएक्यु-४७-पारद-०४-२०१७-१८,

गाव पारद, तालुका मुर्तिजापूर, जिल्हा अकोला.

| अनुक्रमांक | गट नंबर | संयुक्त मोजणीनुसार संपादीत क्षेत्र |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर |
| १ | ३० | ० ४३ |
| | एकूण संपादीत क्षेत्र . . | ० ४३ |

## अनुसूची-दोन

### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव.—घुंगशी बॅरेज प्रकल्प, ता. मुर्तिजापूर, जिल्हा अकोला.

प्रकल्प कार्याचे वर्णन.—घुंगशी बॅरेज प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्राकरिता संपादन करून पाहिजे आहे.

समाजाला मिळणारे लाभ.—घुंगशी बॅरेज प्रकल्पामुळे शेतक-यांच्या शेतीला सिंचनाचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे लाभ क्षेत्रातील शेतक-यांची आर्थिक स्थिती सुधारण्या बरोबरच रोजगारातही वाढ होणे अपेक्षित आहे.

## अनुसूची-तीन

बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे.—सदर प्रकरणात भूधारकांचे विस्थापन होत नसल्यामुळे पुनर्वसन व पुनर्वसाहत होण्याचा प्रश्न उद्धवत नाही. त्यामुळे अनुसूची-तीन चा सारांश **निरंक** समजण्यात यावा.

## अनुसूची-चार

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. ३८ दिनांक १३ मार्च २०१५ अन्वये सिंचन प्रकल्पांना सामाजिक प्रभाव निर्धारणापासून सूट दिली असल्यामुळे सामाजिक प्रभाव निर्धारण करण्यात आलेले नाही. त्यामुळे त्याचा सारांश प्रकाशित करण्याचा प्रश्नच उद्धवत नाही.

## अनुसूची-पाच

सदर प्रकरणी विस्थापन होत नसल्यामुळे व प्रशासकाची नेमणूक झालेली नसल्यामुळे सदर माहितीचा सारांश **निरंक** समजण्यात यावा.

**टीप :—**उक्त जमिनीच्या आराखड्यांचे निरीक्षण उपविभागीय अधिकारी कार्यालय, मुर्तिजापूर, ता. मुर्तिजापूर, जिल्हा अकोला येथे करता येईल.

---

भाग १ (अ. वि. पु.), म. शा. रा., अ. क्र. ११७९.

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक-क.लि.भूसं.-कावि-३०४३-२०१९.—

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या अकोला जिल्ह्याच्या जिल्हाधिका-याने भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून अधिसूचना काढली आहे. आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, अकोला जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांनी कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर " उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी " उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे, याबाबत त्यांची खात्री पटली आहे ;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदींन्वये " उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी " उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसची-तीन, चार व पाच मधील सारांश निरंक आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन हे जिल्हाधिकारी, अकोला आहेत.

## अनुसूची-एक

### संपादीत करावयाच्या जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक एलएक्यु-४७-भटोरी-०३-२०१७-१८,

गाव मौजा भटोरी, तालुका मुर्तिजापूर, जिल्हा अकोला.

| अनुक्रमांक | गट क्रमांक | संयुक्त मोजणीनुसार संपादीत क्षेत्र | शेरा |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | | हे. आर | |
| १ | १४ | ० ८१ | पूर्ण संपादीत. |
| २ | १७ | ० ८१ | पूर्ण संपादीत. |
| ३ | ४५८ | ० ०४ | वहिवाटीनुसार गट क्र. ४५८ परंतु गट नकाशाप्रमाणे ४५२. |
| ४ | ४६१ | ० ०६ | . . |
| ५ | ४६१ | ० ०७ | . . |
| ६ | ४६१ | ० ०६ | . . |
| ७ | ४७० | ० ४० | . . |
| | एकूण संपादीत क्षेत्र . . | २ २५ | |

## अनुसूची-दोन

### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव—घुंगशी बॅरेज प्रकल्प, ता. मुर्तिजापूर, जिल्हा अकोला.

प्रकल्प कार्याचे वर्णन—घुंगशी बॅरेज प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्राकरिता संपादन करून पाहिजे आहे.

समाजाला मिळणारे लाभ.—घुंगशी बॅरेज प्रकल्पामुळे शेतक-यांच्या शेतीला सिंचनाचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे लाभ क्षेत्रातील शेतक-यांची आर्थिक स्थिती सुधारण्या बरोबरच रोजगारातही वाढ होणे अपेक्षित आहे.

## अनुसूची-तीन

बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे.—सदर प्रकरणात भूधारकांचे विस्थापन होत नसल्यामुळे पुनर्वसन व पुनर्वसाहत होण्याचा प्रश्न उद्धवत नाही. त्यामुळे अनुसूची तीन चा सारांश **निरंक** समजण्यात यावा.

## अनुसूची-चार

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. ३८, दिनांक १३ मार्च २०१५ अन्वये सिंचन प्रकल्पांना सामाजिक प्रभाव निर्धारणापासून सूट दिली असल्यामुळे सामाजिक प्रभाव निर्धारण करण्यात आलेले नाही. त्यामुळे त्याचा सारांश प्रकाशित करण्याचा प्रश्नच उद्धवत नाही.

## अनुसूची-पाच

सदर प्रकरणी विस्थापन होत नसल्यामुळे व प्रशासकाची नेमणूक झालेली नसल्यामुळे सदर माहितीचा सारांश **निरंक** समजण्यात यावा.

**टीप :**—उक्त जमिनीच्या आराखड्यांचे निरीक्षण उपविभागीय अधिकारी कार्यालय, मुर्तिजापूर, ता. मुर्तिजापूर, जिल्हा अकोला येथे करता येईल.

**जितेंद्र पापळकर,** (भा.प्र.से.)

अकोला :

जिल्हाधिकारी,

दिनांक १३ ऑगस्ट २०१९.

अकोला.

भाग १ (अ. वि. पु) म. शा. रा., अ. क्र.११८०.

क्रमांक-कावि-अका-भुसं-१२६२-२०१९.—

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या बुलडाणा जिल्ह्याच्या जिल्हाधिका-याने, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे) यांच्या कलम ११ च्या पोटकलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, अधिसूचना, क्रमांक १६८०/२०१८ दिनांक १७-१२-२०१८ अन्वये प्रारंभीक अधिसूचना काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची अनुसूची-दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनीक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, बुलडाणा (जिल्ह्याच्या) जिल्हाधिका-याने, कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे.

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (१) च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनीक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषीत करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीन मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधीत कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी " पुनर्वसाहत क्षेत्र "म्हणून निर्धारीत केले असल्याचे या द्वारे घोषीत केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसुची-चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकारी यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, खामगांव यास पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची - एक

## जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक एलएक्यु-घुई-४५-२०१२-१३ गांव-घुई, तालुका-शेगांव, जिल्हा-बुलडाणा

| | | संपादन जमिनीचा तपशील | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | गट नं. | वाहिती क्षेत्र | एकूण क्षेत्र |
| (१) | (२) | (३) | (४) |
| | | हे. आर | हे. आर |
| १ | २०० | ० ०१ | ० ०१ |
| २ | २०० | ० ०४ | ० ०४ |
| ३ | १९९ | ० ०५ | ० ०५ |
| ४ | १९२ | ० ०४ | ० ०४ |
| ५ | १९३ | ० ०७ | ० ०७ |
| ६ | ३० | ० ०२ | ० ०२ |
| संपादन करावयाचे एकूण क्षेत्र | .. | ० २३ | ० २३ |

उपरोक्त क्षेत्रापैकी कोणतेही क्षेत्र वगळण्यात आले नाही, वा पोट खराब क्षेत्रही नाही.

## अनुसूची–दोन

## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव : कवठा बॅरेज प्रकल्प

| | | |
|---|---|---|
| प्रकल्पकार्याचे वर्णन | : | मौजा घुई येथील जमिन कवठा बॅरेज प्रकल्पाच्या कामाकरिता |
| समाजाला मिळणारे लाभ | : | या प्रकल्पामुळे शेतीसाठी पाणी व सार्वजनीक पाणी पुरवठा व उद्योगांना पाणी पुरवठा होणार आहे. त्याच बरोबर ग्रामिण भागांमध्ये रोजगार निर्मिती होणार असून, ग्रामिण भागातील कष्टकरी, शेतकरी व भुमिहीन शेत मजुर यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. |

**अनुसूची–तीन**

**पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन**

— निरंक —

**अनुसूची–चार**

**पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश**

— निरंक —

**टीप :** उक्त जमिनीच्या आराखड्याचे अभिलेख उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, खामगांव यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

बुलडाणा :
दिनांक २७ सप्टेंबर २०१९.

**डॉ. निरुपमा डांगे,**
जिल्हाधिकारी, बुलडाणा.

---

भाग १ (अ. वि. पु) म. शा. रा., अ. क्र.११८१.

**जिल्हादंडाधिकारी, यांजकडून**

**निवडणूक कालावधीकरिता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४ अंतर्गतचे प्रतिबंधात्मक आदेश**

क्रमांक-कक्ष-गृह-क.लि.-कावि-७३१-२०१९.—

ज्याअर्थी मा. भारत निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०१९ साठी दिनांक २१ सप्टेंबर २०१९ रोजी निवडणूकीचा कार्यक्रम घोषीत केला असून घोषीत केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचार संहिता अंमलात आलेली आहे. त्यामुळे अकोला जिल्ह्यातील विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०१९ निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून खालीलप्रमाणे नमूद बाबींवर फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४ अन्वये आदेश काढणे आवश्यक असल्याची माझी खात्री झाली आहे.

(१) विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०१९ निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यापासून निवडणुकीची प्रक्रिया संपेपर्यंत शस्त्र परवानाधारकास शस्त्र वाहून नेण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे आणि जो कोणी या नियमांचे उल्लंघन करील तो इसम तथा शस्त्र परवानाधारक दंडनीय कार्यवाहीस पात्र ठरेल.

(२) जिल्हादंडाधिकारी/उपविभागीय अधिकारी/तालुका दंडाधिकारी कार्यालय तसेच जिल्ह्यांतील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालय/संस्था आणि शासकीय विश्रामगृहाच्या आवारामध्ये कोणत्याही राजकीय पक्षाने, निवडणूक लढविणा-या, उमेदवाराने किंवा त्यांच्या प्रतिनिधीने किंवा त्यांच्या हितचिंतकाने सभा घेणे, सदरील आवाराचा वापर राजकीय कामासाठी करणे किंवा रॅली काढणे, निवडणुकी संबंधाने पोस्टर्स, बॅनर्स, पॉम्प्लेट्स, कटआऊट, पेंटींग्स, होर्डींग्ज लावणे, निवडणूक विषयक घोषवाक्य लिहीने, किंवा सदरील आवारात निवडणूक विषयक घोषणा देणे किंवा मतदाराला प्रलोभन दाखविणे आणि निवडणुकीच्या कामात बाधा निर्माण होईल अशी कृती करणे ईत्यादी बाबींवर निर्बंध घालण्यात येत आहेत.

(३) निवडणुकीच्या कालावधीमध्ये शासकीय/निमशासकीय सार्वजनिक मालमत्तेची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरुपात विद्रुपीकरण करण्यास निर्बंध घालण्यात येत आहे.

(४) निवडणूक लढविणा-या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी किंवा त्यांच्या हितचिंतकाने मुद्रणालयाचे मालकाने व इतर सर्व माध्यमाद्वारे छपाई करणा-या मालकाने तसेच प्रकाशकाने नमुना मतपत्रिका छापतांना खालील बाबींवर निर्बंध राहतील.

(अ) इतर उमेदवाराचे नाव व त्यांनी नेमून देण्यात आलेले चिन्ह वापरणे.

(ब) नमुना मतपत्रिकेसाठी आयोगाने निश्चित केल्याप्रमाणे कागद वापरणे.

(क) आयोगाने निश्चित केलेल्या कागदाच्या आकारामध्ये नमुना मतपत्रिका छापणे.

(५) राजकीय पक्षांनी, निवडणूक लढविणा-या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी किंवा त्यांच्या हितचिंतकाने निवडणुकीच्या प्रचारासाठी झेंड्याच्या काठ्या उभारणे, कापडी फलक लावणे, भित्तीपत्रक लावणे, घोषणा लिहीने, इत्यादी करीता कोणत्याही व्यक्तीची जागा, ईमारत, आवार भिंती इत्यादीवर संबंधीत मालकाची परवानगी शिवाय व संबंधीत परवाना प्राधिकरणाचे परवानगी शिवाय वापर करण्यास निर्बंध घालण्यात येत आहे.

(६) राजकीय पक्षांनी, निवडणूक लढविणा-या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी किंवा त्यांच्या हितचिंतकाने सार्वजनिक ईमारतीचे ठिकाणी, सार्वजनिक रस्त्यावर, निवडणूकीसंबंधी पोस्टर्स, बॅनर्स, पॉम्प्लेट्स, कटआऊट, होर्डींग्ज, कमाणी लावणे या व इतर बाबीमुळे रहदारीमुळे अडथळा निर्माण होवु शकेल किंवा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नसल्यामुळे निवडणूकीचे साहीत्य कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी, रस्त्यावर रहदारीस अडथळा होईल किंवा अपघात होईल अशा पध्दतीने लावण्यास निर्बंध घालण्यात येत आहेत.

(७) निवडणूकीच्या प्रचार मोहीमेच्या कालावधीत सर्व राजकीय पक्षाचे उमेदवार तसेच निवडणूक लढविणारे उमेदवार आणि त्यांचे कार्यकर्ते आणि हितचिंतक हे वाहनांवर ध्वनीक्षेपक बसवून मोठ्या आवाजातून प्रचार केल्यास ध्वनीप्रदूषण होणे, सर्व सामान्य लोकांच्या जीवनातील शांततेस व स्वास्थास बाधा पोहोचण्याची व उशीरा रात्रीपर्यंत ध्वनीक्षेपण यंत्रणा चालू ठेवण्याची शक्यता असल्यामुळे सदर बाबींवर निर्बंध घालण्यात येत आहेत.

(८) सदर निवडणूकीचे प्रचार मोहीमेच्या कालावधीत सर्व राजकीय पक्षाचे उमेदवार तसेच निवडणूक लढविणारे उमेदवार आणि त्यांचे कार्यकर्ते आणि हितचिंतक याचेकडून निवडणूक प्रचारासाठी वापरण्यात येणा-या वाहनांस पक्ष प्रचाराचे फलक लावणे, झेंडे लावणे इत्यादी बाबीसाठी निर्बंध घालण्यात येत आहे.

(९) कोणत्याही परिस्थितीत सुरक्षेसाठी मोटारगाड्या/ वाहने यांच्या ताफ्यात दहा पेक्षा अधिक वाहने नसावीत असे मा. निवडणूक आयोगाचे निर्देश असल्याने निवडणूक लढविणा-या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी दहा पेक्षा अधिक मोटार गाड्या/वाहनांच्या ताफ्याचा वापर करण्यास प्रतिबंध घालण्यात येत आहे.

(१०) जिल्ह्यात कसल्याही प्रकारचे जात/भाषा/ धार्मिक शिबीरांचे/मेळाव्याचे आयोजनावर निर्बंध घालण्यात येत आहेत.

(११) धार्मिक स्थळे, रुग्णालये, किंवा शैक्षणिक संस्था व सार्वजनिक ठिकाणाचे जवळपास तात्पुरती पक्ष कार्यालये स्थापन करण्यावर निर्बंध घालण्यात येत आहेत.

(१२) उमेदवारांनी नामनिर्देशनपत्र दाखल करते वेळेस निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात वाहनांच्या ताफ्यामध्ये तीन पेक्षा जास्त मोटारगाड्या/वाहने यांचा समावेश नसावा तसेच नामनिर्देशनपत्र दाखल करते वेळेस निवडणूक अधिकारी यांचे दालनात पाच व्यक्ती उपस्थित राहतील या व्यतिरिक्त कोणालाही निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या दालनात प्रवेश दिला जाणार नाही. निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात नामनिर्देशनपत्र दाखल करते वेळेस कार्यालयाच्या परिसरात मिरवणूक/सभा घेणे, कोणत्याही प्रकारच्या घोषणा देणे/वाद्य वाजविणे किंवा गाणी म्हणने आणि कोणत्याही प्रकारचा निवडणूक प्रचार करणेस प्रतिबंध घालण्यात येत आहेत.

(१३) ज्या ठिकाणी मतदान होणार आहे, त्या मतदान केंद्राच्या ठिकाणापासून २०० मीटर परिसरात सर्व पक्षकारांचे मंडप, सर्व दुकाने, मोबाईल फोन, पेजर, वायरलेस सेट, ध्वनीक्षेपक, सर्व प्रकारचे फेरीवाले व इतर ईलेक्ट्रॉनिक उपकरणे, निवडणुकीच्या कामाव्यतिरिक्त खाजगी वाहन, संबंधीत पक्षांचे चिन्हांचे प्रदर्शन व निवडणूक कामाव्यतिरिक्त व्यक्तीस प्रवेश करण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे.

(१४) ज्या ठिकाणी निवडणूक साहित्य कक्ष (Strong Room) आहेत, तसेच जिल्ह्यातील मतदान केंद्रावर आणि ज्या ठिकाणी मतमोजणी होणार आहे, अशा ठिकाणी २०० मीटर परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू राहतील.

(१५) जिल्हादंडाधिकारी/ उपविभागीय अधिकारी/ तालुका दंडाधिकारी कार्यालय तसेच सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालय, शासकीय विश्रामगृह, सार्वजनिक ठिकाणे, रस्त्यावर कोणत्याही राजकीय पक्षाने, व्यक्तीने, संघटनेने निवडणूक लढविणा-या उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने किंवा त्याच्या हितचिंतकाने धरणे आंदोलन,मोर्चा, निदर्शने, उपोषण करण्यावर निर्बंध घालण्यात येत आहे.

(१६) लोकप्रतिनिधीत्व कायदा, १९५१ चे कलम १२६ मधील तरतुदीनुसार कोणतीही व्यक्ती कोणत्याही मतदान क्षेत्रांत, त्या मतदान क्षेत्रातील कोणत्याही निवडणुकीतील मतदान पूर्ण करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेपर्यंत पूर्ण होणा-या ४८ तासांच्या कालावधीत :–

(अ) निवडणुकीच्या संबंधात कोणतीही जाहीर सभा किंवा मिरवणूक बोलावणार नाही, भरवणार नाही, त्यास उपस्थित राहणार नाही, त्यात सहभागी होणार नाही किंवा त्यास उद्देशून अभिभाषण करणार नाही,

(ब) जनतेला चलचित्राच्या, दूरचित्रवाणीच्या किंवा अन्य तत्सम साधनांच्या सहाय्याने निवडणूक विषयक कोणतीही बाब प्रदर्शित करणार नाही.

(क) जनतेचे लक्ष आकर्षून घेण्यासाठी कोणतीही संगीत सभा किंवा अन्य नाट्यप्रयोग किंवा कोणताही करमणुकीचा वा मनोरेंजनाचा

कार्यक्रम आयोजित करुन किंवा आयोजित करण्याची व्यवस्था करून निवडणूक विषयक कोणत्याही बाबींचा प्रचार करणार नाही.

त्याअर्थी, मी, जितेंद्र पापळकर (भा.प्र.से.), जिल्हादंडाधिकारी, अकोला फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४ अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन या आदेशाद्वारे वरील ठिकाणी वरील प्रमाणे कृती करण्यास निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध घालीत आहे. प्रत्येक ईसमावर हे आदेश तामील करणे शक्य नसल्यामुळे हे एकतर्फी आदेश ध्वनीक्षेपकास पोलीसांनी जाहीर करुन त्यास प्रसिध्द करावी असेही आदेशित करीत आहे. सदरील आदेश आज दिनांक २४-०९-२०१९ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी निर्गमित करीत आहे.

अकोला : **जितेंद्र पापळकर,** (भा.प्र.से.)
दिनांक २४ सप्टेंबर २०१९. जिल्हादंडाधिकारी, अकोला.

---

भाग १ (अ. वि. पु) म. शा. रा., अ. क्र.११८२.

**फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) अन्वये आदेश**

क्रमांक-का.वि.दं.शा.कक्ष-४(१)-१०३३-२०१९.—

ज्याअर्थी , सह मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२ यांचे पत्र क्र. जेईएन(विस)-२०१९-प्र.क्र.११४८-१९-३३, दिनांक २१ सप्टेंबर २०१९ नुसार विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीची घोषणा केली असून त्यानुसार महाराष्ट्रातील सर्व मतदारासंघातून विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुका घेण्याबाबतचा निवडणुक कार्यक्रम जाहीर केला असून दिनांक २१ सप्टेंबर, २०१९ ते २७ ऑक्टोबर, २०१९ पर्यंत (निवडणुकीची घोषणा केल्याच्या दिनांकापासून ते निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण होण्याच्या दिनांकापर्यत) महाराष्ट्र राज्याकरीता आदर्श आचार संहिता लागू झालेली आहे.

आणि ज्याअर्थी, बुलडाणा जिल्ह्यातील घातकी व विघातक कृत्यांची परिस्थिती तसेच सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था अबाधित रहावी या बाबी विचारात घेता निवडणुकीच्या कालावधीमध्ये कोणत्याही प्रकारच्या वाहनांवर बसविलेल्या ध्वनीक्षेपकांच्या वापरास सकाळी ६-०० वाजेपासून रात्री १०-०० वाजेपर्यन्त केवळ परवानगी देण्यात येईल. रात्री १०-०० पासून सकाळी ६-०० वाजेपर्यत कोणत्याही क्षेत्रामध्ये तसेच फिरत्या वाहनावरील ध्वनीक्षेपणाच्या वापरास परवानगी देण्यात येणार नाही. कोणत्याही सभेमध्ये किंवा मिरवणुकीच्या वेळी एकाच जागी राहणारे ध्वनीक्षेपक दिलेल्या कालावधी पेक्षा अधिक कालावधीसाठी वापरावयाचे असतील तर संबंधीत अधिका-यांची खास परवानगी घ्यावी लागेल. कोणत्याही ध्वनीक्षेपणांचा वापर दिलेल्या वेळे बाहेर किंवा संबंधित पोलीस स्टेशन अधिकारी यांच्याकडून लेखी परवानगी शिवाय होत असल्याचे निदर्शनास आल्यास ध्वनीक्षेपकांच्या बरोबर जी काही साधने वापरण्यात येतील त्यांचेसह ध्वनीक्षेपक जप्ती करण्याची कार्यवाही करण्यात येईल. फिरत्या वाहनांवर कोणत्याही ध्वनीक्षेपकांचा वापर करावयाचा असल्यास सर्व राजकिय पक्ष, उमेदवार, आणि अन्य कोणतीही व्यक्ती यांना संबंधित पोलीस स्टेशन अधिकारी यांच्याकडून लेखी परवानगी घ्यावी लागेल. लेखी परवानगी शिवाय कोणत्याही ठिकाणी/कोणत्याही वाहनावर ध्वनीक्षेपकाचा वापर होत असल्यास बंदी घालणे आवश्यक असल्याचे माझे ठाम मत झाले आहे.

त्याअर्थी, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४ (१) अन्वये असलेल्या अधिकारानुसार मी, डॉ. निरुपमा डांगे, जिल्हादंडाधिकारी, बुलडाणा, बुलडाणा जिल्ह्यात निवडणुकीच्या कालावधी मध्ये कोणत्याही प्रकारच्या वाहनांवर बसविलेल्या ध्वनीक्षेपकांच्या वापरास सकाळी ६-०० वाजेपासून रात्री १०-०० वाजेपर्यन्त केवळ परवानगी देण्यात येईल. रात्री १०-०० पासून सकाळी ६-०० वाजेपर्यन्त कोणत्याही क्षेत्रामध्ये तसेच फिरत्या वाहनावरील ध्वनीक्षेपणाच्या वापरास परवानगी देण्यात येणार नाही. कोणत्याही सभेमध्ये किंवा मिरवणुकीच्या वेळी एकाच जागी राहणारे ध्वनीक्षेपक दिलेल्या कालावधीपेक्षा अधिक कालावधीसाठी वापरावयाचे असतील तर संबंधीत अधिकां-याची खास परवानगी घ्यावी लागेल. कोणत्याही ध्वनीक्षेपणांचा वापर दिलेल्या वेळे बाहेर किंवा संबंधित पोलीस स्टेशन अधिकारी यांच्याकडून लेखी परवानगी शिवाय होत असल्याचे निदर्शनास आल्यास ध्वनीक्षेपकांच्या बरोबर जी काही साधने वापरण्यात येतील त्यांचेसह ध्वनीक्षेपक जप्ती करण्याची कार्यवाही करण्यात येईल. फिरत्या वाहनांवर कोणत्याही ध्वनीक्षेपकांचा वापर करावयाचा असल्यास सर्व राजकिय पक्ष, उमेदवार, आणि अन्य कोणतीही व्यक्ती यांनी संबंधित पोलीस स्टेशन अधिकारी यांच्याकडून लेखी परवानगी घ्यावी लागेल. लेखी परवानगी शिवाय कोणत्याही ठिकाणी/कोणत्याही वाहनावर ध्वनीक्षेपकाचा वापर होत असल्यास विना परवानगी वापर करण्यांवर बंदी घालीत आहे. हा बंदी आदेश संपूर्ण बुलडाणा जिल्हयाकरीता दिनांक २१ सप्टेंबर २०१९ चे सकाळी १०-०० वाजेपासून ते दिनांक २७ ऑक्टोबर २०१९ चे रात्री २४-०० वाजेपर्यन्त लागू राहील.

या आदेशाचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १८८ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

सदर आदेश माझे सही शिक्क्यानिशी आज दिनांक २२ सप्टेंबर २०१९ रोजी जारी केला आहे.

---

भाग १ (अ. वि. पु) म. शा. रा., अ. क्र.११८३.

**फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) अन्वये आदेश**

क्रमांक-का.वि.दं.शा.कक्ष-४(१)-१०३४-२०१९.—

ज्याअर्थी , सह मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२ यांचे पत्र क्र. जेईएन(विस)-२०१९-प्र.क्र.११४८-१९-३३, दिनांक २१ सप्टेंबर २०१९ नुसार विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीची घोषणा केली असून त्यानुसार महाराष्ट्रातील सर्व मतदारसंघातून विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुका घेण्याबाबतचा निवडणूक कार्यक्रम जाहीर केला असून दिनांक २१ सप्टेंबर, २०१९ ते २७ ऑक्टोबर, २०१९ पर्यंत (निवडणुकीची घोषणा केल्याच्या दिनांकापासून ते निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण होण्याच्या दिनांकापर्यंत) महाराष्ट्र राज्याकरीता आदर्श आचार संहिता लागू झालेली आहे;

आणि ज्याअर्थी, बुलडाणा जिल्ह्यातील सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी तसेच विधानसभा निवडणुका निर्भयपणे व निपक्षपाती पणे पार पाडण्याच्या दृष्टीने निवडणुकीचे कालावधीत उमेदवारांनी प्रचाराचेवेळी त्यांचे वाहन ताफ्यात ३ पेक्षा जास्त वाहने वापरता येणार नाही तसेच निवडणुकीचे प्रचारासाठी वापरावयाचे वाहनांची परवानगी संपूर्ण विधानसभा मतदार संघासाठी/क्षेत्रासाठी त्या क्षेत्रातील संबंधीत निवडणूक अधिकारी यांचेकडून घेणे आवश्यक राहील. प्रचार कार्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे नोंदणी न करण्यात आलेले कोणतेही वाहन प्रचार कार्यासाठी वापरता येणार नाही असे माझे ठाम मत झाले आहे.

त्याअर्थी, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४ (१) अन्वये असलेल्या अधिकारानुसार मी, डॉ. निरुपमा डांगे, जिल्हादंडाधिकारी, बुलडाणा, बुलडाणा जिल्ह्यात निवडणुकीच्या कालावधीत उमेदवारांनी प्रचाराचेवेळी त्यांचे वाहन ताफ्यात ३ पेक्षा जास्त वाहने वापरता येणार नाही तसेच निवडणुकीचे प्रचारासाठी वापरावयाचे वाहनांची परवानगी संपूर्ण विधानसभा मतदार संघासाठी/मतदारसंघाचे क्षेत्रासाठी त्या क्षेत्रातील संबधित निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडून घेणे आवश्यक राहील. प्रचार कार्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे नोंदणी न करण्यात आलेले कोणतेही वाहन प्रचार कार्यासाठी वापरता येणार नाही असे आदेशित करण्यात येत आहे. तथापी, हा आदेश मा. पंतप्रधान आणि इतर राजकीय व्यक्ती ज्यांना Z+ सुरक्षा प्रदान करण्यात आली आहे त्यांना लागू राहणार नाही. हा आदेश संपूर्ण बुलडाणा जिल्ह्याकरीता दिनांक २१ सप्टेंबर २०१९ चे सकाळी १०-०० वाजेपासून ते दिनांक २७ ऑक्टोबर २०१९ चे रात्री २४-०० वाजेपर्यन्त लागू राहील.

या आदेशाचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १८८ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

सदर आदेश माझे सही शिक्क्यानिशी आज दिनांक २२ सप्टेंबर २०१९ रोजी जारी केला आहे.

---

भाग १ (अ. वि. पु) म. शा. रा., अ. क्र.११८४

**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४ (१) अन्वये आदेश**

क्रमांक-का.वि.दं.शा.कक्ष-४(१)-१०३५-२०१९.—

ज्याअर्थी , सह मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२ यांचे पत्र क्र. जेईएन(विस)-२०१९-प्र.क्र.११४८-१९-३३, दिनांक २१ सप्टेंबर २०१९ नुसार विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीची घोषणा केली असून त्यानुसार महाराष्ट्रातील सर्व मतदारसंघातून विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुका घेण्याबाबत निवडणूक कार्यक्रम जाहीर केला असून दिनांक २१ सप्टेंबर, २०१९ ते २७ ऑक्टोबर, २०१९ पर्यंत (निवडणुकीची घोषणा केल्याच्या दिनांकापासून ते निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण होण्याच्या दिनांकापर्यंत) महाराष्ट्र राज्याकरीता आदर्श आचार संहिता लागू झालेली आहे;

आणि ज्याअर्थी, बुलडाणा जिल्ह्यातील घातकी व विघातक कृत्यांची परिस्थिती तसेच सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था अबाधित रहावी या बाबी विचारात घेता निवडणुका जाहीर होताच महाराष्ट्र सार्वजनिक मालमत्ता विरुपन करण्यास प्रतिबंध अधिनियम, १९९५ चे कलम ५ नुसार राजकीय पक्षाने/संघाने/संस्थाने उमेदवार, प्रतिनिधी यांनी सार्वजनिक जागा, शासकीय व निमशासकीय कार्यालयाचे इमारत व जागेवरील लावलेली भिंत्तीपत्रके, फलक, पोस्टर्स, बॅनर्स, कट आऊटस् त्वरीत काढणे आवश्यक असल्याचे तसेच खाजगी जागा, इमारतीवरील संबधीत जागा मालकाचे लेखी संमती शिवाय लावलेली भिंत्तीपत्रके, फलक, पोस्टर्स, बॅनर्स, कट आऊटस् त्वरीत काढणे आवश्यक असल्याचे माझे ठाम मत झाले आहे.

त्याअर्थी, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४ (१) अन्वये असलेल्या अधिकारानुसार मी, डॉ. निरुपमा डांगे, जिल्हादंडाधिकारी, बुलडाणा, बुलडाणा जिल्ह्यातील सर्व राजकिय पक्षाने/संघाने/संस्थाने उमेदवार, प्रतिनिधी यांनी सार्वजनिक जागा, शासकीय व निमशासकीय कार्यालयाची इमारत व जागेवरील लावलेली भिंत्तीपत्रके, फलके, पोस्टर्स, बॅनर्स, कट आऊटस् त्वरीत काढणे आवश्यक असल्याचे तसेच खाजगी जागा, इमारतीवरील संबंधीत जागा मालकाचे लेखी संमती शिवाय लावलेली भिंत्तीपत्रके, फलक, पोस्टर्स, बॅनर्स, कट आऊटस् त्वरीत काढून

टाकण्याबाबत आदेश करीत आहे. सदर आदेश संपूर्ण बुलडाणा जिल्हयाकरीता दिनांक २१ सप्टेंबर २०१९ चे सकाळी १०-०० वाजेपासून ते दिनांक २७ ऑक्टोबर २०१९ चे रात्री २४-०० वाजेपर्यन्त लागू राहील.

या आदेशाचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास उक्त अधिनियमाचे कलम ४ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

सदर आदेश माझे सही शिक्क्यानिशी आज दिनांक २२ सप्टेंबर २०१९ रोजी जारी केला आहे.

---

भाग १ (अ. वि. पु) म. शा. रा., अ. क्र.११८५.

**फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) अन्वये आदेश**

क्रमांक-का.वि.दं.शा.कक्ष-४(१)-१०३६-२०१९.—

ज्याअर्थी , सह मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२ यांचे पत्र क्र. जेईएन(विस)-२०१९-प्र.क्र.११४८-१९-३३, दिनांक २१ सप्टेंबर २०१९ नुसार विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीची घोषणा केली असून त्यानुसार महाराष्ट्रातील सर्व मतदारसंघातून विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुका घेण्याबाबतचा निवडणूक कार्यक्रम जाहीर केला असून दिनांक २१ सप्टेंबर, २०१९ ते २७ ऑक्टोबर, २०१९ पर्यंत (निवडणुकीची घोषणा केल्याच्या दिनांकापासून ते निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण होण्याच्या दिनांकापर्यंत) महाराष्ट्र राज्याकरीता आदर्श आचार संहिता लागू झालेली आहे;

आणि ज्याअर्थी, बुलडाणा जिल्ह्यातील घातकी व विघातक कृत्यांची परिस्थिती तसेच सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था अबाधित रहावी या बाबी विचारात घेता मतदानाचे दिवशी मतदान केंद्रापासून २०० मीटरच्या आत कोणताही मंडप उभारण्यात येऊ नये तसेच जेथे एकाच मतदान केंद्राच्या ठिकाणी किंवा त्याच्या जागेत एका पेक्षा अधिक मतदान केंद्र उभारण्यात आली असतील तेथे अशा मतदान केंद्राच्या गटांसाठी त्या जागेच्या २०० मीटरचे अंतरा पलीकडे उमेदवाराचा केवळ एकच मंडप असावा. तसेच मतदान केंद्र, धार्मिक स्थळे, दवाखाने आणि शैक्षणिक संस्था याच्या पासून २०० मीटरच्या आत मंडप नसावा. उमेदवाराला ज्या ठिकाणी मंडप उभारावयाचा त्या ठिकाणी ३X१.५ फुटाचा एक बॅनर वापरता येईल. ज्या उमेदवाराला असे मंडप उभारावयाचे असतील अशा प्रत्येक उमेदवाराने त्याला या मतदान केंद्रावर मंडप उभारावयाचे आहेत त्या मतदान केंद्राचे नांव त्यांचे अनुक्रमांक याबाबतची लेखी माहिती जिल्हा निवडणूक अधिकारी/ निवडणूक निर्णय अधिकारी यांना आगाऊ कळविण्यात आली पाहिजे. असे मंडप उभारतांना स्थानिक प्राधिकरणाकडून लेखी परवानगी घेतली पाहिजे. मतदारांना मतदान यादीतील अनुक्रमांक देण्याच्या एकमेव प्रयोजनाकरीताच केवळ या मंडपाचा वापर करण्यात आला पाहिजे. अशा मंडपामध्ये कोणत्याही परिस्थितीत गर्दी करण्यास मुभा असणार नाही. मतदान केंद्रातून मत देऊन बाहेर पडलेल्या व्यक्तीस मंडपात येण्याची मुभा असणार नाही. मंडप सांभाळणा-या व्यक्तींनी मतदान केंद्राकडे जाणा-या मतदारांच्या मार्गात कोणताही अडथळा निर्माण करता कामा नये किंवा त्यांना दुस-या उमेदवारांच्या मंडपात जाण्यास प्रतिबंध करता कामा नये. कोणत्याही व्यक्तीस मतदान केंद्राच्या १०० मीटरच्या आतील भागामध्ये आणि मतदान केंद्राचे ठिकाणी किंवा जवळपास जमाव करू नये, मतदारावर मतदान करण्यास किंवा मतदान न करण्यास दबाव आणू नये. तसेच मतदानाचे दिवशी उमेदवारांचे प्रचार चिन्ह प्रदर्शित करु नये. तसेच मतदान केंद्रात सेल्युलर फोन कॉर्डलेस दूरध्वनी, बिनतारी संच इत्यादी नेण्यास किंवा त्यांचा वापर करण्यास बंदी घालणे आवश्यक असल्याचे माझे ठाम मत झाले आहे.

त्याअर्थी, फौजदारी प्रक्रिया संहिता, १७३ चे कलम १४४ (१) अन्वये असलेल्या अधिकारानुसार मी, डॉ. निरुपमा डांगे, जिल्हादंडाधिकारी बुलडाणा, बुलडाणा जिल्ह्यातील मतदान केंद्रापासून २०० मीटरच्या आत कोणताही मंडप उभारण्यात येऊ नये तसेच जेथे एकाच मतदान केंद्राच्या ठिकाणी किंवा त्याच्या जागेत एका पेक्षा अधिक मतदान केंद्रे उभारण्यात आली असतील तेथे अशा मतदान केंद्राच्या गटांसाठी त्या जागेच्या २०० मीटरचे अंतरा पलीकडे उमेदवाराचा केवळ एकच मंडप असावा. तसेच मतदान केंद्र, धार्मिक स्थळे, दवाखाने आणि शैक्षणिक संस्था याच्या पासून २०० मीटरच्या आत मंडप नसावा. उमेदवाराला ज्या ठिकाणी मंडप उभारावयाचा त्या ठिकाणी ३X१.५ फूटाचा एक बॅनर वापरता येईल. ज्या उमेदवाराला असे मंडप उभारावयाचे असतील अशा प्रत्येक उमेदवाराने त्याला या मतदान केंद्रावर मंडप उभारावयाचे आहेत त्या मतदान केंद्राचे नांव त्यांचे अनुक्रमांक याबाबतची लेखी माहिती जिल्हा निवडणूक अधिकारी/निवडणूक निर्णय अधिकारी यांना आगाऊ कळविण्यात आली पाहिजे. असे मंडप उभारतांना स्थानिक प्राधिकरणाकडून लेखी परवानगी घेतली पाहीजे. मतदारांना मतदान यादीतील अनुक्रमांक देण्याच्या एकमेव प्रयोजनाकरीताच केवळ या मंडपाचा वापर करण्यात आला पाहिजे. अशा मंडपामध्ये कोणत्याही परिस्थितीत गर्दी करण्यास मुभा असणार नाही. मतदान केंद्रातून मत देऊन बाहेर पडलेल्या व्यक्तीस मंडपात येण्याची मुभा असणार नाही. मंडप सांभाळणा-या व्यक्तींनी मतदान केंद्राकडे जाणा-या मतदारांच्या मार्गात कोणताही अडथळा निर्माण करता कामा नये किंवा त्यांना दुस-या उमेदवारांच्या मंडपात जाण्यास प्रतिबंध करता कामा नये. कोणत्याही व्यक्तीस मतदान केंद्राच्य १०० मीटरच्या आतील भागामध्ये आणि मतदान मंडपामध्ये आणि मतमोजणीच्या ठिकाणी सेल्युलर फोन कॉर्डलेस दूरध्वनी, बिनतारी

संच इत्यादी नेण्यास किंवा त्यांचा वापर करण्यास बंदी घालीत आहे. हा बंदी आदेश संपूर्ण बुलडाणा जिल्ह्याकरीता दिनांक २१ सप्टेंबर २०१९ चे सकाळी १०-०० वाजेपासून ते दिनांक २७ ऑक्टोबर २०१९ चे रात्री २४-०० वाजेपर्यन्त लागू राहील.

या आदेशाचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १८८ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

सदर आदेश माझे सही व शिक्क्यानिशी आज दिनांक २२ सप्टेंबर २०१९ रोजी जारी केला आहे.

भाग १ (अ. वि. पु) म. शा. रा., अ. क्र. ११८६.

**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४ (१) अन्वये आदेश**

क्रमांक-का.वि.दं.शा.कक्ष-४(१)-१०३७-२०१९.—

ज्याअर्थी , सह मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२ यांचे पत्र क्र. जेईएन(विस)-२०१९-प्र.क्र.११४८-१९-३३, दिनांक २१ सप्टेंबर २०१९ नुसार विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीची घोषणा केली असून त्यानुसार महाराष्ट्रातील सर्व मतदारसंघातून विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुका घेण्याबाबतचा निवडणूक कार्यक्रम जाहीर केला असून दिनांक २१ सप्टेंबर, २०१९ ते २७ ऑक्टोबर, २०१९ पर्यंत (निवडणुकीची घोषणा केल्याच्या दिनांकापासून ते निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण होण्याच्या दिनांकापर्यंत) महाराष्ट्र राज्याकरीता आदर्श आचार संहिता लागू झालेली आहे;

आणि ज्याअर्थी, बुलडाणा जिल्ह्यातील घातकी व विघातक कृत्यांची परिस्थिती तसेच सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था अबाधित रहावी या बाबी विचारात घेता मतदानाचे दिवशी व मतदान केंद्र व परिसरात जमाव करण्यास, मतदारांना घाबरविण्यास, बळजबरीने मतदान करण्यास किंवा मतदान न करण्यास प्रवृत्त करणे, उमेदवाराच्या निवडणूक चिन्हाचे प्रदर्शन करणे, मोबाईल फोन, कॉर्डलेस फोन, पेजर, वायरलेस सेट व ईतर ईलेट्रॉनिक्स उपकरणांचा वापर करणे, वाहनांचा प्रवेश, मतदान केंद्रामध्ये अनधिकृत प्रवेश यावर बंदी घालणे आवश्यक असल्याचे माझे ठाम मत झाले आहे.

त्याअर्थी, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४ (१) अन्वये असलेल्या अधिकारानुसार मी, डॉ. निरुपमा डांगे, जिल्हादंडाधिकारी, बुलडाणा, बुलडाणा जिल्ह्यातील मतदानाचे दिवशी मतदान केंद्र व परिसरात जमाव करण्यास, मतदारांना घाबरविण्यास, बळजबरीने मतदान करण्यास किंवा मतदान न करण्यास प्रवृत्त करणे, उमेदवाराच्या निवडणूक चिन्हाचे प्रदर्शन करणे, मोबाईल फोन, कॉर्डलेस फोन, पेजर, वायरलेस सेट व ईतर ईलेट्रानिक्स उपकरणांचा वापर करणे, वाहनांचा प्रवेश, मतदान केंद्रामध्ये अनधिकृत प्रवेश यावर बंदी घालीत आहे. हा आदेश संपूर्ण बुलडाणा जिल्ह्याकरीता दिनांक २१ सप्टेंबर २०१९ चे सकाळी १०-०० वाजेपासून ते दिनांक २७ ऑक्टोबर २०१९ चे रात्री २४-०० वाजेपर्यन्त लागू राहील. तथापि, हा आदेश सर्व मतदानाशी संबधित अधिकारी, सर्व पोलीस अधिकारी, सुरक्षा पथकातील कर्मचारी, निवडणूक निरीक्षक यांना लागू राहणार नाही.

या आदेशाचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १८८ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

सदर आदेश माझे सही शिक्क्यानिशी आज दिनांक २२ सप्टेंबर २०१९ रोजी जारी केला आहे.

---

भाग १ (अ. वि. पु) म. शा. रा., अ. क्र. ११८७.

**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४ (१) अन्वये आदेश**

क्रमांक-का.वि.दं.शा.कक्ष-४(१)-१०३८-२०१९.—

ज्याअर्थी , सह मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२ यांचे पत्र क्र. जेईएन(विस)-२०१९-प्र.क्र.११४८-१९-३३, दिनांक २१ सप्टेंबर २०१९ नुसार विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीची घोषणा केली असून त्यानुसार महाराष्ट्रातील सर्व मतदारसंघातून विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुका घेण्याबाबतचा निवडणूक कार्यक्रम जाहीर केला असून दिनांक २१ सप्टेंबर, २०१९ ते २७ ऑक्टोबर, २०१९ पर्यंत (निवडणुकीची घोषणा केल्याच्या दिनांकापासून ते निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण होण्याच्या दिनांकापर्यंत) महाराष्ट्र राज्याकरीता आदर्श आचार संहिता लागू झालेली आहे;

आणि ज्याअर्थी, बुलडाणा जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था परिस्थिती कायम राहण्याच्या दृष्टीने तसेच विधानसभा निवडणूक निर्भय व निपक्षपातीपणे पार पाडण्याच्या दृष्टीने जिल्ह्यातील सर्व मुद्रक व प्रकाशक यांनी लोक प्रतिनिधीतत्व अधिनियमाचे कलम १२७ ए मधील तरतुदीचे पालन होण्यासाठी निवडणूकीशी संबधित साहित्य मुद्रीत व प्रकाशित करतांना (उदा. पोस्टर्स, पॉम्प्लेट ईत्यादी ) त्यावर मुद्रक/प्रकाशक यांचे नाव व पत्ता असणे आवश्यक आहे. मुद्रकाजवळ प्रकाशकाच्या स्वाक्षरीचे करारपत्र असणे आवश्यक आहे. निवडणुकीचे साहित्य प्रकाशीत केल्यापासून ३ दिवसांचे

आत प्रकाशित साहित्याच्या ३ प्रती व मुद्रकाला प्रकाशकाने प्राधिकृत केल्याबाबतचे करारपत्र निवडणूक शाखेत सादर करणे आवश्यक राहील. तसेच छापील निवडणूक साहित्याच्या ४ प्रती व सदर निवडणूक साहित्य छापण्याकरीता आलेल्या खर्चाचा तपशिल निवडणूक शाखेस सादर करणे आवश्यक असल्याचे माझे ठाम मत झाले आहे.

त्याअर्थी, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४ (१) अन्वये असलेल्या अधिकारानुसार मी, डॉ. निरुपमा डांगे, जिल्हादंडाधिकारी, बुलडाणा, बुलडाणा जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था परिस्थिती कायम राहण्याच्या दृष्टीने तसेच विधान सभा निवडणूक निर्भय व निपक्षपातीपणे पार पाडण्याच्या दृष्टीने जिल्ह्यातील सर्व मुद्रक व प्रकाशक यांनी निवडणुकीशी संबंधित साहित्य मुद्रीत व प्रकाशीत करतांना (उदा.पोस्टर्स पॉंप्लेट ईत्यादी) त्यावर मुद्रक/प्रकाशक यांचे नाव व पत्ता असणे आवश्यक आहे. मुद्रकाजवळ प्रकाशकाच्या स्वाक्षरीचे करारपत्र असणे आवश्यक आहे. निवडणूकीचे साहित्य प्रकाशीत केल्यापासून ३ दिवसांचे आत प्रकाशित साहित्याच्या ३ प्रती व मुद्रकाला प्रकाशकाने प्राधिकृत केल्याबाबतचे करारपत्र निवडणूक शाखेत सादर करणे आवश्यक राहील तसेच छापील निवडणूक साहित्याच्या ४ प्रती व सदर निवडणूक साहित्य छापण्याकरीता आलेल्या खर्चाचा तपशिल निवडणूक शाखेस सादर करण्याबाबत आदेशीत करीत आहे.

या आदेशाचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १८८ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

सदर आदेश माझे सही व शिक्क्यानिशी आज दिनांक २२ सप्टेंबर २०१९ रोजी जारी केला आहे.

---

भाग १ (अ. वि. पु) म. शा. रा., अ. क्र. ११८८.

**फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) अन्वये आदेश**

क्रमांक-का.वि.दं.शा.कक्ष-४(१)-१०३९-२०१९.—

ज्याअर्थी , सह मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२ यांचे पत्र क्र. जेईएन(विस)-२०१९-प्र.क्र.११४८-१९-३३, दिनांक २१ सप्टेंबर २०१९ नुसार विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीची घोषणा केली असून त्यानुसार महाराष्ट्रातील सर्व मतदारसंघातून विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुका घेण्याबाबत निवडणूक कार्यक्रम जाहीर केला असून दिनांक २१ सप्टेंबर, २०१९ ते २७ ऑक्टोबर, २०१९ पर्यंत (निवडणुकीची घोषणा केल्याच्या दिनांकापासून ते निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण होण्याच्या दिनांकापर्यत) महाराष्ट्र राज्याकरीता आदर्श आचार संहिता लागू झालेली आहे;

आणि ज्याअर्थी, बुलडाणा जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था परिस्थिती कायम राहण्याच्या दृष्टीने तसेच विधानसभा निवडणूक निर्भय व निपक्षपातीपणे पार पाडण्याच्या दृष्टीने निवडणुकीचे कालावधीत देशाच्या व राज्याच्या सुरक्षिततेला धोका पोहचेल अशा प्रकारचे सार्वजनिक ठिकाणी भाषण देणे, नकला करणे आक्षेपार्ह चित्र व चिन्ह प्रदर्शीत करणे ज्या द्वारे नियमाचा भंग होईल असे कृत्य करणे गैर आहे असे माझे ठाम मत झाले आहे.

त्याअर्थी, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४ (१) अन्वये असलेल्या अधिकारानुसार मी, डॉ. निरुपमा डांगे, जिल्हादंडाधिकारी, बुलडाणा, बुलडाणा जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था परिस्थिती कायम राहण्याच्या दृष्टीने तसेच विधानसभा निवडणूक निर्भय व निपक्षपातीपणे पार पाडण्याच्या दृष्टीने निवडणुकीचे कालावधीत देशाच्या व राज्याच्या सुरक्षिततेला धोका पोहचेल अशा प्रकारचे सार्वजनिक ठिकाणी भाषण देणे, नकला करणे आक्षेपार्ह चित्र व चिन्ह प्रदर्शित करणे ज्या द्वारे नियमाचा भंग होईल असे कृत्य करण्यास बंदी घालीत आहे.

या आदेशाचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १८८ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

सदर आदेश माझे सही व शिक्क्यानिशी आज दिनांक २२ सप्टेंबर २०१९ रोजी जारी केला आहे.

बुलडाणा : **डॉ. निरुपमा डांगे,**
दिनांक २२ सप्टेंबर २०१९. जिल्हादंडाधिकारी, बुलडाणा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT PRESS, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR: DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.